**वाचले :-** १. शासन राजपत्र दि.५ जानेवारी २०१७.

२. महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४२- क .

३.श्रीमती प्रमिला विष्णु नागरे रा. सायखेडा ता.निफाड जि.नाशिक यांचा दि.१७/९/२०१७,२०/७/२०१८, १८/८/२०१८.रोजीचा बिनशेती परवानगी अर्ज.

४.म.महानगर नियोजनकार नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नाशिक यांचेकडील क्र.नामप्रविमा रेखांकन/मौजे सायखेडा ता.निफाड/ग.नं.४२३पै/८१८ दि.१९/७/२०१८.

५.मंडळ अधिकारी,सायखेडा ता.निफाड यांचे क्र.५०/२०१७दि.५/२/२०१८रोजीचे स्थळनिरीक्षण अहवाल

६.श्रीमती प्रमिला विष्णु नागरे रा.सायखेडा ता.निफाड जि.नाशिक यांचे दि.३/८/२०१८रोजीचे प्रतिज्ञापत्र / करारनामा.

---

उपविभागीय अधिकारी निफाड
भाग निफाड यांचे कार्यालय
**क्र.जमा/एनए/एसआर/८९/२०१८**
**निफाड दिनांक. ०3/०९/२०१८**

## आदेश

अर्जदार **श्रीमती प्रमिला विष्णु नागरे रा. सायखेडा ता.निफाड जि.नाशिक** यांनी **मौजे सायखेडा ता.निफाड जि.नाशिक येथिल ग.नं.४२३पैकी क्षेत्र ६६००चौ.मी.** या क्षेत्रात **निवासी** प्रयोजनासाठी बिनशेती वापराकामी शासन राजपत्र दि.५ जानेवारी २०१७ प्रमाणे महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम,१९६६ चे कलम ४२-क अन्वये अकृषीक सारा व रुपांतरीत कर भरुण घेणेकामी विनंती केली आहे

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्र. जमा/एनए/एसआर/८९/**२०१८ दि.२९/८/२०१८** अन्वये **निवासी** प्रयोजनासाठी अकृषिक सारा व. रुपांतरीत कर भरणा करणेबाबत कळविले असता त्यांनी अकृषिक सारा रक्कम रु.६६०/- + रुपांतरीत कर र.रु.३३६००/- असे एकुण रक्कम रु.३९६०/- दि.२९/८/२०१८ रोजी ००२९१७३७०१ या लेखाशिर्षाखाली भरणा केलेली असून तहसिलदार **निफाड** यांनी त्यांचेकडील चलनाची प्रत सादर केली आहे.

म.महानगर नियोजनकार,नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नाशिक यांचेकडील पत्र क्र.नामप्रविमा/रेखांकन/मौजे सायखेडा ता.निफाड/ग.नं.४२३पै/८१८ दि.१९/७/२०१८नुसार विषयांकित मिळकतीस **निवासी** प्रयोजनासाठी विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र दिलेले आहे.

महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम,१९६६ चे कलम ४२-क शासन राजपत्र दि.०५ जानेवारी २०१७ अन्वये **मौजे सायखेडा ता.निफाड जि.नाशिक येथिल ग.नं.४२३पैकी क्षेत्र ६६००चौ.मी.** या क्षेत्रात **निवासी** प्रयोजनार्थ अकृषीक सारा व रुपांतरीत कर भरल्याबाबतचे चलन मंजुरीची परवानगी खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

**अटीशर्ती**

१. अर्जदार यांनी नियोजन प्राधिकरणाच्या नियमानुसार आवश्यक त्या परवानग्या घेणे बंधनकारक राहील. तसेच सहाय्यक संचालक नगररचना / कार्यकारी अभियंता, यांनी मंजुर केलेल्या अभिन्यासातील खुली जागा (ओपन स्पेस) तसेच रस्ते स्थानिक प्राधिकरणाकडे वर्ग करणे आवश्यक राहील.

२. सदर मिळकत ही नाशिक महारगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रात समाविष्ट असल्याने त्यानुसार अर्जदार यांना अटी व शर्ती बंधनकारक राहील. तसेच विकास परवानगी (अभिन्यास व बांधकाम नकाशे मंजुरी) नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

३. अधिकारी अभिलेख व जमिनीच्या मालकी हक्काबाबत तसेच इतर हक्काबाबत भविष्यात काही विवाद उदभवल्यास व त्यामध्ये तथ्य आढळल्यास तसेच मालकी हक्काबाबत काही गंभिर स्वरुपाच्या कायदेशिर त्रृटी आढळल्यास,न्यायालयाचे काही निर्णय झाल्यास त्यांची संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील. त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

४. सदर मिळकतीबाबत भविष्यात सदर जमिन भोगवटादार वर्ग-२/न.अ.श.नश.ना.ज.क.म,देवस्थान इनाम, व इतर कोणत्याही नियंत्रित सत्ता प्रकारची असल्यास तसेच शासनास अधिभार देय असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेणे तसेच त्या वेळच्या शासनाच्या प्रचलित नियमानुसार शासनास देय होणारा नजराणा / इतर रकमा भरणेची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

५. सदर आदेश अर्जदार यांचा चालु ७/१२ व प्रतिज्ञापत्रांच्या अधिन राहुन दिलेला आहे.

६. प्रश्नांकित मिळकतीच्या इतर हक्कात कोणतेही वित्तीय बोजे असल्यास त्यास अर्जदार / मिळकत धारक जबाबदार राहतील यास अधिन राहुन सदरचे चलन मंजुर केले आहे.

उपविभागीय अधिकारी
निफाड भाग निफाड

प्रति,
श्रीमती प्रमिला विष्णु नागरे
रा. सायखेडा ता.निफाड जि.नाशिक

१.तहसिलदार - निफाड यांचेकडेस मुळ संचिका पा.क्रं.१ ते१३१ सह अभिलेखात जतन करणे व योग्य कार्यवाहीकामी रवाना. याशिवाय आणखी असे की, परवानदार यांनी अकृषिक प्रयोजनाकरिता जमिनीचा वापर सुरु केल्याबाबत कळविल्यानंतर विहीत नमून्यामध्ये तसेच अकृषिक प्रयोजन नोंदवहीमध्ये बिनशेती सा-याबाबत वसुलीच्या दृष्टीने योग्य ती नोंद घ्यावी. शासन राजपत्र दि.५ जानेवारी २०१७ अन्वये ६० दिवसाच्या आत परवानदार यांचेकडून योग्य त्या नमुन्यात सनद करुन देण्यात यावी. तशी अधिकार अभिलेखात योग्य त्या नोंदी घेण्यात याव्यात.

टीप-परवानदार यांनी मोजणी फी चलन क्रं.२८७/२०१८ दि.२९/८/२०१८ रोजी रक्कम रु.२५०००/- भरली असून ती प्रकरणात सामील केली आहे.

२.म.उपअधिक्षक भूमि अभिलेख, निफाड यांचेकडे माहितीसाठी अग्रेषित.

३.म.महानगर नियोजनकार,नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण नाशिक

४.सरपंच ग्रामपंचायत सायखेडा ता. निफाड जि.नासिक.

५.तलाठी - सायखेडा ता. निफाड जि.नासिक यांना अधिकार अभिलेखात योग्य त्या नोंदी घेणेकामी रवाना.

स्वाक्षरीत/-
उपविभागीय अधिकारी
निफाड भाग निफाड